PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 4, ISSUE 4

# शिक्षण व सामाजिक बांधिलकी

**डॉ. एस. एन. बरडे**
सहयोगी प्राध्यापक
जनता शिक्षण महाविद्यालय चंद्रपूर
(महाराष्ट्र) भारत

शिक्षण समाज परिवर्तनाचे साधन मानले जाते. 'शिक्षण' ह्या संकल्पनेचा समग्र दृष्टीने विचार केला तर ते खरे ही आहे. शिक्षणाच्या माध्यमातून अपेक्षित समाज परिवर्तन होत नसेल तर हे साधनच दोषपूर्ण आहे किंवा या साधनाची अंमलबजावणी ही योग्य पद्धतीने होत नाही किंवा अंमलबजावणी करणाऱ्याची पद्धती कुठे तरी दोषपूर्ण आहे असेच म्हणावे लागेल. स्वातंत्र्योत्तर काळात अनेक शिक्षण आयोगांनी, समित्यांनी शिक्षण रचनेच्या बदलाबाबत अहवाल सादर केलेले आहेत. शिक्षणाच्या सर्व स्तरांचा अंतर्भाव ह्या अहवालांमध्ये घेण्यात आलेला आहे.

आजच्या आंतरजालाच्या युगात संगणकीय शिक्षण हा सर्वांचाच मूलभूत हक्क आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही आणि हा विचार जवळजवळ मान्य पावलेला आहे. कारण हे शिक्षण व्यक्ती विकासाचे त्याच बरोबर समाज परिवर्तनाचेही महत्वाचे साधन आहे. आपल्या देशाने लोकशाही पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपल्या देशाला सुज्ञ, सुसंस्कृत व आदर्श नागरीकाची गरज लक्षात घेवून आपल्याला लाभलेल्या नेतृत्वांनी शिक्षणाकडे लक्ष केंद्रित केले. शिक्षणाच्या सर्वच स्तरावर आमूलाग्र बदल करण्यात आले व परीस्थितीच्या निकडीनुसार त्यात बदल करण्यात येत आहेत. आजच्या जागतिक स्पर्धेत अमेरीका, चीन, रशिया, जपान यासारखी बलाढ्य राष्ट्रांच्या बरोबरीने भारत देश शिक्षणाच्या बळावरच प्रगती करतांना दिसून येतो आहे. जागतिक स्पर्धा व बदलत जाणारी परीस्थिती याला योग्य प्रकारे सामोरे जाणारे व ही आव्हाने पेलणारे मनुष्यबळ निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. अध्ययन, अध्यापनाची गुणवत्ता,सामाजिक परिवर्तनास सहाय्य, नितिमत्तेचा

विकास, उत्पादन क्षमता व स्वयंपूर्णता, लोकशाही मूल्यांचा विकास, आधुनिकीकरण, राष्ट्रीय एकात्मता, चारित्र्य व आध्यात्मिक विकास या दृष्टीने शिक्षण क्षेत्राद्वारे अनेक प्रयत्न झालेले आहेत.

आजचे युग हे परिवर्तनाचे युग आहे. विविध क्षेत्रात प्रत्येक क्षणाला बदल होत आहे ह्या बदलाचा वेग मागील काही वर्षापासून प्रचंड वाढलेला आहे. या परिवर्तनामुळे समाज व मानवी जीवनावर याचा परीणाम झालेला दिसून येतो. शिक्षण क्षेत्र हे समाज प्रणालीचे महत्वाचे अंग असल्यामुळे या परिवर्तनाचा, घटनांचा परिणाम होणे स्वाभाविकच आहे. कारण शिक्षण प्रणाली आणि समाज प्रणाली ह्या दोन्हीही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यामुळे ह्या दोघांचाही एकमेकावर परिणाम होत असतो. शिक्षणामध्ये, समाजामध्ये होणाऱ्या या बदलांचा, परिवर्तनाचा स्वीकार केल्याशिवाय शिक्षणात प्रवाहितता येणार नाही. 'प्रवाहितता' हे शिक्षण प्रक्रियेचे महत्वपूर्ण वैशिष्ट्य असले पाहीजे नाही तर शिक्षण प्रक्रियेची गती मंद होवू शकते. आजच्या या परिवर्तनाच्या युगात प्रचंड वेगाने बदलणाऱ्या घटनांचा स्वीकार करणारी, येणाऱ्या परिस्थितीची आव्हाने पेलणारी व्यक्तिमत्व ही या शिक्षण प्रणालीच्या व सामाजिक परिवर्तनांच्या माध्यमातून निर्माण करावी लागेल.

आजचे युग हे स्पर्धेचे, प्रचंड बदलांचे युग आहे. ज्या व्यक्तिजवळ गुणवत्ता आहे, नवनविन तंत्रज्ञान अवगत करण्याचे कौशल्य आहे तीच व्यक्ती या जगात आपले अस्तित्व अबाधित ठेवू शकेल. त्या व्यक्तिलाच या युगात भविष्य राहील. शिक्षकी व्यवसायास पूरक गुण अणणारे गुणवत्ताधारक, व्यासंगी, संशोधकीय वृत्ती असणारे, नवनिर्माण क्षमता असणाऱ्या शिक्षकांची संख्या कमी आढळते. ज्यांना काम करावेसे वाटते त्यांना संधी नाही व ज्यांना संधी आहे त्यांच्यामध्ये हे कार्य करण्याची तळमळ नाही. त्यामुळे शिक्षण क्षेत्राला फार मोठ्या आव्हानांना नेहमीच सामोरे जावे लागत आहे. आजच्या काळात शिक्षणाचे बदलते संदर्भ लक्षात घेवून समाजामध्ये होणारे परिवर्तन, समाजाच्या गरजा, सामाजिक अपेक्षा, आकांक्षाचा शिक्षण क्षेत्राशी निगडीत सर्व घटकांनी गांभिर्याने विचार करणे गरजेचे आहे. याशिवाय येणाऱ्या आव्हानांचा यशस्वीपणे मुकाबला करता येणार नाही.

व्यक्तिविकासाबरोबरच सामाजिकतेचा विकास करून सामाजिक व राष्ट्रीय जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हे शिक्षण प्रक्रीयेचे महत्वाचे कार्य ठरले आहे. परंतु प्रचलित शिक्षण पद्धतीतून याचा अभावच आढळतो. त्यामुळे भ्रष्टाचारास वाव, विघातक कृत्ये, गुन्हेगारीत प्रचंड वाढ, दहशतवाद, युद्धजन्य परिस्थिती अशा गोष्टींना सामोरे जावे लागते त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक दृष्टीकोन, नागरिकत्वाची जाणीव, देशनिष्ठा, राष्ट्रनिर्माण क्षमता निर्माण करण्याची जबाबदारी आजच्या शिक्षण व्यवस्थेची आहे. समाजाच्या सकारात्मक भूमिकेशिवाय शिक्षण प्रक्रीयेला हे उद्दीष्ट साधता येणार नाही. आजही शिक्षण हे

समाज परिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे आणि यामुळे शिक्षक हा परिवर्तनाचा अग्रदूत, सामाजिक अभियंता आणि भविष्यातील समाजाचा आरेखक बनू शकतो. फक्त त्याचे कार्य अध्यापनाशीच संबंधित न राहाता समाजाचे सांस्कृतिक व सामाजिक रूपांतर घडविणारे ही असले पाहीजे. आधुनिक युगात शिक्षण ही एक महत्वाची सामाजिक शक्ती (Social Power) झाली आहे. सर्वांची अपेक्षा असते की सामाजिक परिवर्तनात शिक्षणाने पुढाकार घ्यावा. परंतु समाज हा परंपरा प्रिय असतो. परंतु काळाच्या ओघात ज्ञानात प्रचंड उणिवा निर्माण होतात. परंपरेने अनेक दोष शिरतात. आदर्शाचे स्वरूप बदलते तेव्हा नव्या काळाला अनुरूप असे बदल घडवून आणण्याची जबाबदारी ही शिक्षणाचीच असते. शिक्षण प्रक्रियेच्या माध्यमातून सामाजिक बदल घडूवन आणून समाजाची प्रगती करता येते.

**शिक्षकांची सामाजिक बांधिलकी** :

शिक्षकांची सामाजिक बांधिलकी म्हणजे शिक्षकांचे समाजावर असणारे निरपेक्ष प्रेम होय. शाळांच्या माध्यमातून शासनाच्या विविध कार्यक्रमातून समाजातील विविध संस्था संघटनांच्या उपक्रमातून हे प्रेम आपल्याला दिसत असते. विद्यार्थ्यांचे पालक हे पाल्यासंबंधीच्या त्यांच्या व्यथा, त्यांच्या समस्या बरेचदा शिक्षकांसोबत बोलतात. समाजातील ह्या लोकांमध्ये आपल्याबद्दल आपुलकीची, आदराची भावना असल्याचे पाहुन शिक्षकांमध्ये एक वेगळाच उत्साह निर्माण होतो. बरेचदा विद्यार्थ्यांची त्यांच्या पालकांची गर्दी शिक्षकापूढे पाहायला मिळते. शिक्षकाचे कार्य हे फक्त अध्यापनापुरतेच मर्यादित राहात नाही. समाजात असणारे विविध प्रश्न आणि समस्या ह्याबाबतही त्याला विचार करावाच लागतो. सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून अशा अनेक समस्यांचे निवारण करण्याचा प्रयत्न शिक्षकाला करावा लागतो. उदाहरण द्यायचे झाले तर सामाजिक अंधश्रद्धा, निरक्षरता, पर्यावरणाचा ऱ्हास, हुंडाबळी, प्रदुषण, बालमजूरी अशा अनेक सामाजिक समस्या आहे. ह्या सर्व सामाजिक समस्यांच्या निराकरणात शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण ठरत असते. ह्या सर्व प्रश्नांची समस्यांची तिव्रता शिक्षकाने समजून घेतली पाहीजे आणि त्यांचा अभ्यास करून समाजातील व्यक्तींना ती समजावून सांगून त्यांच्यामध्ये जागरूकता निर्माण केली पाहीजे. आपल्या मर्यादा सांभाळून जेवढी सामाजिक बांधिलकी जोपासता येईल तेवढी शिक्षकाने ती जोपासली पाहीजे. सामाजिक समस्यांबाबत बरेचदा शिक्षक हा समाजातील वेगवेगळ्या व्यासपीठावरून, वृत्तपत्रांतून, समाज माध्यमातून या समस्यांबद्दल आपले विचार परखडपणे मांडीत असतो. भाषण किंवा मार्गदर्शनापूरता मर्यादित न राहता तो स्वतः या समस्या सोडविण्यासाठी सक्रिय असतो. अशाप्रकारे त्याचे समाजप्रेम व्यक्त होत असते.

सामाजिक प्रगती बरोबरच शिक्षकांच्या सामाजिक बांधिलकेचे, समाज निष्ठेचे कार्य सतत वाढत जाणारे आहे. त्यामुळे सामाजिक बांधिलकी ही मर्यादीत राहू शकत नाही. आजच्या काळात अनेक सामाजिक उपक्रम जसे रक्तदान, नेत्रदान, देहदान, कोणत्याही प्रकारची नैतीक आपत्ती अशा अनेक कार्यात त्याचा सक्रीय सहभाग अपेक्षित आहे व ही सामाजिक बांधिलकी तो जोपासत आहे. प्रत्येक सामाजिक समस्या सोडविण्यास तो समर्थ असला पाहीजे. तत्पर असला पाहीजे. येत्या काही काळात अनेक क्षेत्रातही अनेक बदल होणार आहेत. त्यामुळे सामाजिक बांधिलकीच्या भावनेतील आशय ही बदलणार आहे. तेव्हा या सामाजिक बांधिलकेची समज सर्व शिक्षकांना असणे गरजेचे आहे. प्रत्येक शिक्षकाने ही सामाजिक बांधिलकी अंगी बाणवून भविष्यात येणारी सर्व परीस्थिती हाताळण्यास सक्षम असले पाहीजे तेंव्हाच शिक्षक हा समाज अभियंता, समाज शिल्पकार ठरेल.

## संदर्भ

1. www.knowledgehut.com
2. www. researchgate. net
3. www.kundoc.com
4. www.ddceutkal.ac.in